HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणाचे विचार आणि कार्य



**रेश्मा मारुती भगत**
संशोधक इतिहास विभाग , मोहोळ जि. सोलापूर
**(M.A.B.Ed) History**
**NET - Qualified**

- **प्रस्तावना :-**

आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीमध्ये अनेक समाजसुधारकांनी आपले योगदान दिले आहे. यामध्ये अनेक स्त्री समाजसुधारकांचाही समावेश होता. पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे , रमाबाई रानडे, आंनदीबाई जोशी अशा स्त्रीयांनी समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले होते. त्यातीलच एक महत्व पूर्ण स्त्री जिने स्त्री शिक्षणास प्रारंभ केला. शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणली ती म्हणजे सावित्रीबाई फुले होय. अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या स्त्रीयांना ज्ञानाचा प्रकाश सावित्रीबाईंनी दाखवला. त्यांनी लावलेल्या ज्ञानज्योतीच्या प्रकाशामुळेच आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आहेत. डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक या सर्व क्षेत्रात स्त्रीया दिसतात. रेल्वे, विमान सुध्दा चालवतात इतकेच काय पण देशाच्या पंतप्रधानही होतात. आज मी हा जो शोध निबंध लिहित आहे याचे श्रेय जाते ते सावित्रीबाईंनाच. सावित्रीबाईनी आयुष्यभर स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले. पुर्वीच्या काळी स्त्रियांवरती अनेक बंधने होती. स्त्रीयांची अवस्था गुलामांपेक्षाही वाईट होती. मुलगी जन्माला येणे सुद्धा अशुभ मानले जाई. जन्मभर तिची उपेक्षा होई. ज्ञानार्जनास स्त्रीयांना मनाई असे. स्त्रीने फक्त चूल आणि मूलच पहावे असा समाजाचा समज होता.

ही सारी स्थिती बदलण्यासाठी १९ व्या शतकात एका स्त्रीने प्रयत्न केले त्या स्त्रीचे नाव सावित्रीबाई ! स्त्री जातीच्या उत्कर्षासाठी मोलाचे कार्य ज्यांनी आपल्या पतीच्या खांद्याला खांदा लावून केले अशा स्त्री जातीच्या उध्दार कर्त्या म्हणजेच सावित्रीबाई ! त्यांनी समाजाला 'चूल आणि मूल' हा मंत्र विसरायला भाग पाडून एक नविन मंत्र दिला तो म्हणजे 'चूल मूल आणि शिक्षण '.

अशा थोर क्रांती ज्योतीचे कार्य आपणास नक्कीच स्फुर्तिदायी ठरेल.

*** उद्देश :-**

१. सावित्री फुले यांच्या कार्याची माहिती घेणे .
२. सावित्री फुले यांच्या शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक जनजागृतीची माहिती घेणे.
३. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेल्या कार्यांचा आढावा घेणे .

*** सावित्रीबाई फुलेंचे शैक्षणिक कार्य :-**

सावित्रीबाईंचा जन्म नायगाव येथे सातारा जिल्ह्यात ३ जानेवारी १८३१ रोजी झाला. सावित्रीच्या आईचे नाव लक्ष्मी तर वडिलांचे नाव खंडोजी. १८४० मध्ये सावित्रीचा जोतिरावांशी विवाह झाला. सावित्रीबाई लहानपणापासूनच साहसी होत्या. त्यात त्यांना ज्योतिबांचे मार्गदर्शन मिळाले व सावित्रीबाई एका नवीन मार्गावर चालू लागल्या. त्याकाळी समाजात अनेक रुढी, परंपरा, अस्पृश्यांवर अन्याय, अत्याचार होत असत. हे सर्व जोतिबांना बघवत नसे. या सर्वातून समाज सुधारायचा असेल तर शिक्षण हे हवेच हे जोतिरांवाना उमगले. या शिक्षणाची सुरुवात प्रथम आपल्या घरापासूनच करु या तत्वाने सावित्रीबाईच्या शिक्षणाला सुरुवात झाली.

*** सावित्रीबाईंच्या शिक्षणास सुरुवात :-**

स्त्रीया शिकणार ही कल्पनाच मुळी समाज बाह्य होती. स्त्रियांमधील हा बदल विकसनशील आणि महत्वाचा होता. स्त्री शिकली तरच सारे कुटूंब शिकेल, प्रगती होईल हा विचार समाजात रुजणे खूप महत्वाचे होते हे जाणून जोतिबांनी सावित्रीबाईंना शिकविण्यास सुरुवात केली. संपूर्ण स्त्री जातीलाच शिक्षणाचा तेजस्वी मार्ग दाखवू या विचारानेच जोतिबा सावित्रीला शिकवू लागेल. सावित्रीही मोठ्या आवडीने शिकू लागली. रोज दुपारी मळयात जेवण झाले की, आंब्याच्या झाडाखाली जोतीबांची शाळा सुरु होई. सावित्रीबाई विद्यार्थीनी आणि जोतीराव शिक्षक. जमीन स्वच्छ करुन जमिनीवर धुळपाटी तयार केली जाई व या धूळपाटीवर बोटांनी किंवा झाडाच्या काटकीने अक्षरे काढून शिकवायला सुरुवात झाली. पाटी नाही, पेन्सिल नाही, खडू नाही, फळा नाही, कागद नाही, पेन नाही म्हणून शिक्षण अडले नाही.

**" जिच्या हाती पाळण्याची दोरी "**
**ती जगाते उध्दारी "**

या सुविचारास अनुसरुन देशाचा भाग्योदय सुशिक्षित माता घडवू शकतात याबद्दल जोतीराव सावित्रीबाई यांच्यात दुमत नव्हते. जोतीरावांनी सावित्रीबाईंना स्वतः शिक्षण दिले. धूळपाटीवर अक्षरे उमटू लागली. कौतूकाच्या नजरेने सावित्री त्या अक्षरांकडे पाहू लागली . एक एक अक्षर शिकू लागली, स्मरणात ठेवू लागली, पुन्हा पुन्हा गिरवू लागली. तिला खूप आनंद झाला. शिकवण्यातला आनंद तिला उमगला. ज्ञानाचा प्रकाश तिला दिसू लागला. तिचा आनंद गगनात मावेना. मन आनंदाने डोलू लागलं, नाचू लागल.

जेव्हा सावित्री शिक्षण घेत आहे हे समाजातील लोकांना समजले तेंव्हा सगळे जण त्यांची अवहेलना करु लागले . निंदा करु लागले पण आपल्यावर होत असलेल्या निंदेला ती घाबरली नाही. उलट त्याकडे दुर्लक्ष करुन ती आपल्या पतीच्या प्रोत्सहनाप्रमाणे जोतिबांच्या ध्येयाशी एकरुप होवून शिकत राहिली व आपले शिक्षण व शिक्षिकेचे ट्रेनिंग पूर्ण केले.

*** स्त्री शिक्षणासाठी धडपड :-**

जोतिबांना व सावित्रीबाईंना शिक्षणाचे महत्व कळले होते. शिक्षणाशिवाय माणसाची प्रगती होणार नाही हे समजले होते. आपल्या समाजाची ही दैन्यावस्था ही शिक्षण न घेतल्यामुळे झाली आहे हे त्यांनी जाणले. "विद्या हेच धन"! विद्येनेच माणसाला माणूसपण येते. समाजातील भेदाभेद, उच्चनिचपणा, दारिद्रय हटवायचे असेल तर ज्ञानाला पर्याय नाही. जोतीबांनी सरकारी नोकरी न धरता शिक्षणकार्याला वाहून घ्यायचे ठरवले. सावित्रीबाईंनी त्यांना खंबीरपणे साथ द्यायचं ठरवलं. मग निश्चय झाला मुलींसाठी शाळा काढण्याचा.

०१ जानेवारी १९४८ रोजी बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाडयात मुलींसाठी पाहिली शाळा सुरु झाली. स्त्रीयांच्या प्रगतीसाठी सावित्रीबाईंनी पहिलं पाऊल उचललं. या कार्यात त्यांना सगुणाबाई व तात्यासाहेब भिडे यांनी खुप मदत केली. सुरुवातीला शाळेत ०६ मुली आल्या. सुरुवातीला शाळेत येण्यास कुणीच तयार होईना. मुलींनी शिकणे ही कल्पनाच लोकांना मान्य नव्हती . मग सावित्रीबाई घरोघरी जावून पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून देवू लागल्या. स्वतः सावित्रीबाई या मुलींना शिकवू लागल्या. कारण पुरुषाने मुलींना शिकवणे ही कल्पनाच समाजाला मान्य नव्हती. सावित्रीबाई स्वतः शिक्षिका तर झाल्याच पण शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणूनही काम करु लागल्या. सावित्री बाईंचे हे कार्य सर्वार्थाने महान आहे. महाराष्ट्रातल्या त्या पहिल्या स्त्री शिक्षिका !

*** सावित्रीबाईंना शैक्षणिक कार्यात आलेले अडथळे**

त्या काळात एवढे मोठे सामाजिक काम हाती घेणे सोपे नव्हते . 'स्त्रियांकरिता शाळा' हा विचारच लोकांना सहन होणारा नव्हता. स्त्री-शिक्षण म्हणजे अनर्थ व अधार्मिक कार्य आहे असे समजले जात होते . त्यामुळे समाज बिथरला. लोकांना ही गोष्ट आवडली नाही. प्रथम मुलींच्या शाळेला शिक्षकच मिळेना तेंव्हा सावित्रीबाईंनी शिक्षकाची धुरा स्वतः सांभाळली. त्या नियमित शाळेत जावू लागल्या. मुलींना शिकवू लागल्या. मुलींना स्वच्छतेचे महत्व पटवून देवू लागल्या शाळेत मूलींना कंटाळा येवू नये म्हणून त्यांना गोष्ट सांगत, खेळ शिकवत असत.

एक बाई ऐटीत शाळेत जाते. मुलींना शिकवते ही गोष्ट सनातनी कर्मठ लोकांना पटली नाही. तसेच सावित्रीबाईंच्या कार्याला कडवा विरोध करणारा तत्कालीन ब्राम्हण समाज होताच. असंतोषाचा प्रचंड स्फोट समाजात झाला. धर्म बुडाला म्हणून ओरड सुरु झाली. सनातन्यांचा संताप शिंगेला पोहचला. सावित्रीबाईंना त्रास देवून त्यांचे हे कार्य बंद पाडण्याचे अनेक प्रयत्न केले गेले.

सावित्रीबाई रस्त्याने जात असताना अंगावर शेणमारा करणे, चिखल फेकणे, खडे मारणे, अचकट विचकट बोलणे, निंदा नालस्ती करणे हे उद्योग सुरु झाले. तरीही सावित्रीबाई हे सर्व सहन करुन मुलींना शिकवतच होत्या. सावित्रीबाई जिद्दी समाजसेविका होत्या. या असल्या अडथळयांना त्यांनी भीक घातली नाही. त्या डगमगल्या नाहीत. सावित्रीबाईंनी मुलींना शिकविण्याचे कार्य मोठ्या धीराने आणि धडाडीने चालूच ठेवले व अडचणीवर उपाय म्हणूनी सावित्रीबाई आपल्या पिशवीत एक साडी ठेवत व शाळेत गेल्यावर खराब झालेली साडी काढून चांगली साडी घालत व मुलींना शिकवित असत.

पण एकदा एक विचित्र प्रसंग घडला. सावित्रीबाई शाळेत जात असताना रस्त्यात एक धटींगण पुढे आला व सावित्रीबाईंचा रस्ता अडवला, शाळा बंद करण्याची धमकी देवू लागला, भोवताली खुप गर्दी जमा झाली परंतू मदतीला कोणीही येईना सावित्रीबाई क्षणभर गोंधळल्या काय करावे सुचेना बाजुला उभे असलेले टवाळखोर हसत होते. सावित्रीबाईंनी त्याला समजावून सांगण्याचा खूप प्रयत्न केला परंतू त्याचा उपयोग झाला नाही. सावित्रीबाईंनी मनाचा निर्धार केला व नागिनी सारख्या त्या चवताळून पुढे आल्या आणि त्या धटिंगणाच्या श्रीमुखात लगावली. "खबरदार पुढे आलास तर ..." सावित्रीबाईंनी रुद्रावतार धारण केला. अचानक बसलेल्या थोबाडीने आणि सर्वांसमोर झालेल्या मानहाणीने तो तेथुन पळत सुटला. हे व यासारखे अनेक प्रसंग घडले परंतू सावित्रीबाईंनी आपली जिद्द, चिकाटी सोडली नाही. आपले कार्य अविरत चालू ठेवले.

काही लोकांनी तर सावित्रीबाईंच्या सासऱ्यांचे कान फुंकणे सुरु केले. गोविंदराव सात्विक मनोवृत्तीचे साधे भोळे गृहस्थ होते. त्यांच्या मनावर धर्माचा पगडा होता. गोविंदरावांनी जोतीबा सावित्रीला बोलावले व सांगितले . "एकतर घर सोडा किंवा तुमचे काम बंद करा " तेंव्हा जोतिबा - सावित्रीने घर सोडण्याचा धाडसी निर्णय घेतला आणि आपले शिक्षण कार्य पुढे सुरु ठेवले. त्यांना वाळीतही टाकले होते. वाटेत येणा-या अडचणींना, कठीण प्रसंगाना सावित्रीबाई निर्भयपणे तोंड देत असत. त्यांनी कधीही हार पत्करली नाही. अन्याय सहन करण्या पेक्षा अन्यायाला स्त्रियांना धैयाने तोंड देता आले पाहिजे हेच या विविध प्रसंगातून सावित्रीबाईंनी शिकवले.

### * मुलींची आणि पालकांची समजूत -

मूलींना शिक्षण देणे हे सामाजिक परिवर्तनाचे मूलगामी साधन आहे. हे सावित्रीबाईंनी जाणले होते. हळूहळू मुलींची संख्या वाढू लागली. परंतू काही सनातनी कर्मठ लोक शाळेत जाणाऱ्या मुलींनाही रस्त्याने जाताना येताना त्रास देत असत. तेव्हा या मुलींचे आई वडील वैतागत व घाबरुन आपल्या मुलींना शाळेत पाठवत नसत. अशा वेळी सावित्रीबाई मुलींच्या पालकांना नीट समाजावून सांगत. प्रत्यक्ष त्या मुलींच्या पालकांना भेटायला जावून त्यांना शिक्षणाचे महत्व सांगत असत. सावित्रीबाई रोज मुलींना स्वतः बरोबर घेवून जात. त्यांना धीर देत. मुलीकडे वैयक्तिक पणे लक्ष देत असत. कधीही विद्यार्थीनीवर रागवत नसत त्यामुळे मुलींना त्या प्रिय झाल्या. त्यामुळे शाळेतील मुलींची संख्या वाढू लागली. मुलींच्या आई वडिलांची खात्री पटली. शाळेची प्रगती होत होती हे सावित्रीबाईंच्या कठोर परिश्रमाचे फळ होते. सावित्रीबाई तन मनाने आपले कार्य करत होत्या. वाटेत कितीही संकटे आली तरीही त्याची पर्वा केली नाही.

सावित्रीबाई या शाळेत येणा-या मुलींच्या फक्त बाईंच नव्हत्या तर त्या मुलींची आई झाल्या होत्या. शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलीवर त्यांचे बारीक लक्ष असे. मुलींच्या सर्व प्रकारच्या अडचणी समजावून घेत असत व त्या सोडवत असत.

मुलींच्या मानसिक आर्थिक संकटात मुलींचे मनोधैर्य राखून त्यांना प्रसंगी आधारही देत. काही प्रसंगी सावित्रीबाई - जोतीबा मुलींच्या घरी जात त्यांची समजुत काढत यामुळे मुलींचे कुटूंब व सावित्रीबाई यांच्यात एक कौटूंबिक सलोखा, जिव्हाळा निर्माण झाला होता.

### * इतर सामाजिक कार्य :-

स्त्रीयांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी फुले पती - पत्नी झटत होते. त्याकाळी समाजात व्रतवैकल्य, कूळधर्म, कूलाचार, केशवपण सतीची चाल, बालविवाह, विषमविवाह अशा अनेक चालीरीती, रुढी होत्या. या रुढी परंपरा बंद करण्यासाठी स्त्रीयांना एकत्र आणणे, विचारांचे आदान - प्रदान करणे हे उपक्रम सावित्रीबाई राबवू लागल्या. यासाठी सावित्रीबाईंनी 'महिला सेवा मंडळाची' स्थापना केली. 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना केली. वाट चुकलेल्या विधवांची व त्याच्यापोटी जन्मलेल्या मुलांची सावित्रीबाई दयाळूपणे व प्रेमाने अहोरात्र काळजी घेत असत . अनाथ मुलांच्या माता बनल्या. केशवपन पध्दतीस पायबंद घातला. विधवा पूर्नविवाह घडवून सभा स्थापना केली. या सभेमार्फत हळदीकूंकू, रसपान आदी कार्यक्रम होत असत. प्रौढ स्त्रियांचे शिक्षण आणि स्त्रियांच्या समस्या इत्यादी विषयांवर चर्चा होत असे, उपाय सुचवले जात. ही स्त्रियांची पहिलीच संघटना होती. सांघिक शक्ती शिवाय स्त्री मुक्ती आंदोलन शक्य होणार नाही हे सावित्रीबाईंनी सर्वांना दाखवून दिले.

सावित्रीबाईंना मूलबाळ नव्हते . त्यांनी आपल्याच अनाथालयातील एका मुलाला दत्तक घेतले व त्याचे नाव यशंवत ठेवले. पुढे हा यशवंत शिकून डॉक्टर झाला. त्याचा विवाह करुन दिला दुसऱ्याच्या मुलाला दत्तक घेवून त्याला आईचे प्रेम द्यायला काळीज आभाळाएवढे लागते आणि सावित्रीबाईकडे होते. अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या हे सनातन्यांना आजिबात आवडले नाही. त्यांनी समाजात अशी बातमी पसरवली की जोतीबा-सावित्री अस्पृश्यांसमवेत ख्रिस्ती धर्म स्विकारणार आहेत. तेव्हा चिडलेल्या लोकांनी फुले दांपत्याला वाळीत टाकले. काहींनी तर त्यांचा खून करण्याचा प्रयत्न केला.

अस्पृश्यांसाठी घरापुढचा पाण्याचा हौद खुला केला. दुष्काळात ठिकठिकाणी अन्नछत्र उघडून मदत केंद्र सुरु केली. मुलामुलींच्या जेवणाची सोय केली. प्रौढांना सुशिक्षित करण्यासाठी त्यांनी 'शेतकरी कामगार मजूर' अशा प्रौढ स्त्री पुरुषांसाठी साक्षरता वर्ग सुरु केले. समाज सुधारायचा असेल, तो सुजाण, शहाणा आणि सुशिक्षित बनवायचा तर शिक्षणाला पर्याय नाही हे त्यांनी जाणले होते. शिक्षणाच्या मार्गाने त्यांनी दीन , दलित स्त्रीयांचा उध्दार केला. समाजातील सर्व घटकातील सर्व स्तरातील लोकांनी शिक्षणाचे महत्व समजून प्रत्येकाने शिक्षण घ्यावे असे त्यांना वाटे.

*** सावित्रीबाईंचा सत्कार**

" विद्येविना मती गेली !
मतीविना नीती गेली !
नीतीविना गती गेली !!
गतीविना वित्त गेले !
वित्ताविना शुद्र खचले !
इतके अनर्थ एका अविद्येने केले !"

विद्येचे महत्व किती अलौकीक आहे यांचे मार्मिक वर्णन महात्मा फुलेंनी या काव्यात केले आहे.

१८४८ -१८५२ याकाळात सावित्रीबाई - जोतीबा यांनी पुण्यात व पुण्याच्या परिसरात अठरा शाळा काढल्या . पुण्यात मिशनरी लोकांना जे जमले नाही ते सावित्रीबाईंनी करुन दाखवले . सावित्रीबाईंना त्याच्या शैक्षणिक कार्यात यश मिळाले . सावित्रीबाई व जोतीबा यांच्या कार्याची वार्ता इंग्लंडच्या राणी पर्यंत पोहोचली. आणि मग फुल्यांचा सत्कार करण्याचे ठरले. पुण्याच्या विश्राम बाग वाड्यात फुल्यांचा मोठा सत्कार करण्यात आला. मेजर कॅन्डी यांनी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा सत्कार पुण्याचे कलेक्टर इ. सी. जोन्स & मिसेस जोन्स यांच्या उपस्थितीत केला. ही खरोखरच अभिमानाची गोष्ट आहे.

जोतीबांच्या निधनानंतरही सावित्रीबाईंनी आपले कार्य धडाडीने पुढे चालवले. सावित्रीबाईंचे शैक्षणिक कार्य त्यांनी त्यासाठी केलेली धडपड त्यांचे साहस, धैर्य याची ओळख महाराष्ट्राला आहेच. पण सावित्रीबाई उत्तम कवयित्री सुध्दा होत्या. त्यांनी काव्यफुले, सुबोध रत्नाकर, बालकांना समुपदेश यासारखे काव्यग्रंथ लिहिले. या कवितांमध्ये शिक्षण, जातीभेद व निसर्गावरील प्रेमाचे दर्शन होते. सावित्रीबाईचे निबंधही विचार प्रवर्तक होते. सुधारणूक विद्यादान हे त्यांचे निबंध आहेत. १८९७ मध्ये सर्वत्र प्लेगची महाभयानक साथ आली होती. सावित्रीबाई या काळात घरोघरी जावून प्लेगचे रुग्ण गोळा करीत व त्यांना हॅास्पीटल मध्ये पोहचवत असत. असेच एका मुलाला खांदयावरुन दवाखान्यात नेताना सावित्रीबाईंना प्लेगची लागण झाली व १० मार्च १८९७ ला प्लेग संसर्गाने सावित्री बाईंचा मृत्यू झाला.समाजकार्य करता करताच त्यांनी स्वतःचा देह ठेवला व आयुष्यभर इतरांसाठी जीवन वेचलेल्या त्यागी महान स्त्रीचा अंत झाला .

*** सारांशलेखन :-**

सावित्रीबाई फुले म्हणजे जे जे चांगले ते ते सांगणारी, शिकविणारी, अज्ञान अंधः कार नाहीसा करणारी, नवीन जीवन दृष्टी देणारी, जीवन फुलवणारी प्रकाशाकडे नेणारी अशी शिक्षिका होती. सार्वजनिक कार्यासाठी घराबाहेर पडलेली महाराष्ट्रातील नव्हे तर भारतातील पहिली स्त्री आहे.

शिक्षणाचे दरवाजे बंद असलेल्या शुद्र समजल्या जाणाऱ्या समाजात जन्म घेतलेली ही स्त्री लग्नानंतर शिक्षण घे व समाज जागृतीकरिता घराबाहेर पडते यावरुन सावित्रीबाईंची थोरवी दिसून येते. सावित्रीबाई शिक्षणाचे काम करु लागल्यामुळे वेदकाळातील स्त्री शिक्षणाचे खंडीत झालेले कार्य पुन्हा सुरु झाले. स्त्रीयांची गुलामगिरीतून मुक्तता होण्यास सुरुवात झाली. कोणावरही अन्याय झालेला सावित्रीबाईंना खपत नसे .

सावित्रीबाई भारतातील पहिल्या थोर शिक्षिका, मुख्याध्यापिका स्त्री शिक्षणाच्या पूरस्कर्त्या, अनाथांच्या कैवारी, स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या प्रणेत्या होत्या. सावित्रीबाईचा काळ म्हणजे १५० वर्षापुर्वीचा काळ. सर्वत्र अज्ञानाचे, अनाचाराचे, विषमतेचे, धर्मरुढीचे साम्राज्य पसरले होते. अशा अंधार युगातील सावित्रीबाईचे कार्य अलौकीक आहे.शिक्षणाने माणसाचे जीवन बदलून जावे. विचारांचा, मनाचा विकास व्हावा असे हेतूपुर्वक शिक्षण सावित्रीबाईंनी विद्यार्थ्यांना दिले .

आधुनिक स्त्रीच्या प्रगतीचा पाया सावित्रीबाईंनी घातला असून स्त्रीयांच्या पायातील अज्ञानरुपी गुलामगिरीच्या शृंखला तोडण्याची ही सुरुवात होती. आजची स्त्री सर्व क्षेत्रात अग्रक्रमाने पुढे येत आहे. यांचे पूर्ण श्रेय सावित्रीबाईंना आहे.

*** निष्कर्ष :-**

१. सावित्रीबाईंनी आपल्या परीने समाजातला अंधार दूर करण्याचा प्रयत्न केला. व ज्ञानाचा प्रकाश सर्व दिशांना पसरवला.
२. स्त्रीयांनी सावित्रीबाईंना कधीही विसरु नये कारण आधुनिक स्त्रीच्या प्रगतीचा पाया सावित्राबाईंनीच घातला होता.
३. अन्यायाविरुध्द पेटून उठणाऱ्या सावित्रीबाईंचाच आदर्श कायम जीवनात ठेवावा .
४. सावित्रीबाईंनी जसे न घाबरता एका धटिंगणाला पळवून लावले होते. तसेच आजही स्त्रीयांवर अन्याय अत्याचार करणाऱ्या धटिंगणांना पळवून लावले पाहिजे.

*** संदर्भग्रंथ :-**

१. सावित्रीबाई फुले यांचे चारित्र - सुजाता टिकेकर
२. पहिली भारतीय शिक्षिका - सा.फुले - बा. ग. पवार
३. सावित्रीबाई फुले - उन्मेष
४. सावित्रीबाई फुले - प्रा. दिलीप गरड